**रे.के.नं.९३/२०२३**
**नि.क्र. ११/क**

अभियोगपक्षा तर्फे **साक्षीदार क्र. १** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :—

| | |
|---|---|
| माझे नाव | :— महेश नारायण कोळी |
| वय | :— ४७ |
| व्यवसाय | :— नोकरी |
| राहणार | :— मुंबई |

**सरतपास सरकार तर्फे ए.पी.पी. श्रीमती एस.व्ही. चव्हाण यांचे मार्फत सुरु:—**

१. मी सन २०२३ मध्ये मेहेर फाउंडेशन प्रा. लि. या कंपनीमध्ये आर. सी.एम. म्हणून कार्यरत होतो. आमची कंपनी जे.एन.पी.टी. येथून बी.पी. सी.एल. टर्मिनल उरण येथे गॅस पाईप लाईनचे फाउंडेशन टाकण्याचे काम करते. सन २०२२ मध्ये आम्हाला कॉन्ट्रक्स भेटले. फुंडे गावापासुन आम्ही काम सुरु केले. दि. १९.०१.२०२३ रोजी मला आमच्या कंपनीतील फुंडे गाव येथील साईड इनचार्ज दिलीप कुमार पांडे यांनी फोन केला व सांगितले की, प्रकाश म्हात्रे हे फुंडे गावातील रहिवासी असून त्यांनी साईडवर जावून शिवीगाळ केली व धमकी देवून काम बंद केले.

२. मी साईड वर गेलो व प्रकाश यांच्याशी बोललो. प्रकाश याला कन्ट्रक्शन मटेरियल सपलार्यसचे काम पाहिजे होते. मी नकार दिला असता त्यांनी शिवीगाळ करुन धमकी देवून काम बंद केले. त्यानंतर मी न्हावाशेवा पोलिस ठाणे येथे जावून तक्रार दिली. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्रमांक १२ देण्यात येत आहे.

३. मी दि. २४.०१.२०२४ रोजी परत पोलिस ठाण्यात गेलो. त्यावेळीस

कलम वाढविण्यात आले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. मी कराराचे पेपर दाखल केले आहे. ती प्रत छायाकिंत असून अर्धवट आहे म्हणून त्यास निशाणी देता येत नाही.

सरतपास पूर्ण

आरोपी तर्फे तहकुबीचा अर्ज खारिज करण्यात आला आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्रीमती प्रज्ञा सरवणकर यांनी घेण्यास नकार दिला तसेच आरोपीने देखील उलटतपास घेण्यास नकार दिला म्हणून उलटतपास संपला.**

उलटतपास संपला

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण़— उरण (जी.के.आर. टंडन)
दिनांक :०३/०९/२०२४ २रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग